MHBI060007942023

**<u>आदेश नि. क्र. १९ खाली</u>**

अर्ज नि. १९ हा वादीने वादमिळकत मोजणी करण्याकरिता तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांचे नेमणूक करण्याकरिता दाखल केला आहे.

२. वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. बी. शिनगारे यांनी असा युक्तिवाद केला की, वादीने सदर दावा मालकी घोषीत करण्याकरिता व निरंतर मनाई हुकुम मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी हे वादीचे गावातील व शेतशेजारी असून वादमिळकतीशी त्यांचा काहीही संबंध नसताना प्रतिवादी क्र. १ ते ४ हे वादमिळकतीच्या उत्तर बाजूकडून व प्रतिवादी क्र. ५ ते ७ हे वादमिळकतीच्या दक्षिण बाजूकडून वादीच्या कब्जे व उपभोगास हरकत अडथळा निर्माण करीत असून अतिक्रमण करण्याच्या धमक्या देत आहे. वादीने प्रतिवादींना दिनांक १०/०३/२०२३ रोजी जमीनीच्या क्षेत्रावरील वाद कायमचा संपुष्टात येणेकामी जमीनीच्या मोजणी करून हद्दी खुणा कायम करून घेण्याची विनंती केली असता प्रतिवादीने त्यास नकार दिला. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, वाद मिळकत मोजणी करणे दाव्याच्या निकालाच्या दृष्टीने आणि वादी व प्रतिवादीमध्ये वाद संपविण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. त्यामुळे वादमिळकत मोजणी करणेकरिता तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांचे सदर प्रकरणी कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्याची विनंती केली आहे.

३. याउलट प्रतिवादी क्र. २ ते ६ यांच्याविरूध्द एकतर्फा आदेश व प्रतिवादी क्र. १ व ७ विरूध्द विना लेखी कैफियत आदेश पारित झालेला आहे. याव्यतिरिक्त प्रतिवादी क्र. १ व ७ यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे त्यांच्याविरूध्द सदरील अर्ज विना म्हणणे चालवण्याचा आदेश पारित केला आहे. प्रतिवादी क्र. १ व ७ यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी युक्तिवाद केला नाही. त्यामुळे सदरील अर्ज त्यांच्या युक्तिवादाशिवाय आदेशाकरिता हाती घेण्यात येतो.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने सदर दावा मालकी घोषीत करण्याकरिता व निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केल्याचे दिसून येते. वादी व प्रतिवादी यांच्यातील मिळकतीबाबतचा वाद संपुष्टात आणण्याकरिता वादमिळकतीची मोजणी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांचेमार्फत करणे आवश्यक व संयुक्तिक आहे. करिता खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

१. अर्ज नि. १९ मंजुर करण्यात येतो.

२. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात येते. त्यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी मौजे अंबाजोगाई येथील जमीन गट क्र. ७९/२ जमीनीची नियमाप्रमाणे मोजणी करावी.

३. वादीने कमीशन फीस भरावी.

४. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांनी दोन्ही पक्षकारांनी पुर्व नोटीस देवून कमीशनचे काम करावे व त्याचा अहवाल लवकरात लवकर न्यायालयात दाखल करावा.

५. वादीने प्रोसेस फीस भरल्यानंतर कमीशन रीट पाठविण्यात यावी.

**स्वाक्षरीत**

ठिकाण : अंबाजोगाई
दिनांक : ०६.०५.२०२४

( **बा. ना. गोडबोले** )
४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अंबाजोगाई.

:: **Certificate of Stenographer** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order."

Dictated On : 06/05/2024.

Transcribed On : 06/05/2024.

Checked & Signed On : 06/05/2024.

Date : 06/05/2024.
Place : Ambajogai.

**Sd/-**
**( A. K. Bachate )**
Jr. Clerk
Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Ambajogai.